# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०** **दिनांक:- १५ जानेवारी, २०२०**

जळगाव दि. १५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या तत्वज्ञान विभागाच्यावतीने मंगळवारी “२१ व्या शतकातील भारत आणि स्वामी विवेकानंद” या विषयावर व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक, सामाजिकशास्त्रे प्रशाळा डॉ.अर्चना देगावकर होत्या. यावेळी स्वामी विवेकानंद अध्ययन व संशोधन प्रमुख डॉ.मनिष जोशी उपस्थित होते. राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख सहा.प्रा.शरद पाटील यांनी आपल्या व्याख्यानातून स्वामी विवेकानंदाचे बहूआयामी व्यक्तीमत्वाचे व विचारांचे महत्व विशद करत राष्ट्र निर्मितीसाठी त्यांच्या विचारांची आजच्या युगात किती आवश्यकता आहे हे स्पष्ट केले. प्रास्ताविक हर्षल साळूंखे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निलेश खलाणे यांनी केले.सहा.प्रा.नरेंद्र भोई यांनी आभार मानले. स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दिनांक:- १५ जानेवारी,२०२०

जळगाव दि.१५ ( ) गुंतून गेलो दोघे आपण

मला न कळले, तुला न कळले

कसा उन्हाळा झाला श्रावण

मला न कळले, तुला न कळले

अशी उत्कट प्रेमाची गझल सादर करत गझलकार प्रदीप निफाडकर यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संक्रांतीचा दिवस तरुणाईसाठी अधिकच गोड केला.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विद्यापीठातील भाषा अभ्यास व संशोधन प्रशाळेच्यावतीने बुधवारी प्रदीप निफाडकर व डॉ.अविनाश सांगोलकर यांच्या गझलवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तरुणांचा उत्तम प्रतिसाद लाभला सामाजिक आणि प्रेमाच्या गझल सादर करतांना गझले मधील वृत्तबंध, गझलेत योजिले जाणारे शब्द याचीही उकल केली.

हसण्याची संधी असूनी

ते सारे रडले होते

मी हसत हसत जगलो

मी दु:ख पचविले होते

अशा आशयाची गझल सादर करतांना निफाडकर यांनी कवीमध्ये दुनिया बदलण्याची ताकद असते असे नमूद केले.

पालखी आणू नका दारात माझ्या

संत सारे नांदती देहात माझ्या

या गझलेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ.अविनाश सांगोलकर यांनी भिमा कोरेगाव प्रकरणावर

माणूस मारणारे ते लोक कोण होते

मूल्यास गाळणारे ते लोक कोण होते?

असा सवाल गझलेतून उपस्थित केला. त्याच वेळी त्यांनी

पतंग माझा गोता खायी ती आल्यावर

पंखा देतो थंड थंडसा वारा

तरी ही अंगाची का लाही होते

ती आल्यावर

अशी तारुण्य सुलभ भावना व्यक्त करणारी गझल सादर केली. एका पेक्षा एक सरस सादर झालेल्या या गझलांमुळे बुधवारची सकाळ प्रसन्न झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे होते. डॉ. आशुतोष पाटील यांनी केले. नेत्रा उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. प्रा.माहूलीकर यांनी गझलेमुळे जगण्याला बळ मिळते असे मत व्यक्त केले. समारोप प्रसंगी प्रा.पगारे यांनी सुरेश भट यांची गझल सादर केली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी